Study tour (Experimental learning) geography 2018-19

दि.०४/०१/२०१९

**प्रति,**
**मा. प्राचार्य साहेब,**
**श्री संत गजानन महाविद्यालय,**
**खर्डा.**

विषय: भूगोल विभागाच्या वतीने शैक्षणिक सहलीच्या आयोजनाबाबत....

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती पूर्वक अर्ज सादर करण्यात येतो कि, दरवर्षी प्रमाणे २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये भूगोल विभागाच्या वतीने बी.ए. व्दितीय व तृतीय वर्षातील विशेष भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभ्यास सहल निघोज (कुकडी नदीपात्रातील रांजणखळगे), राळेगणसिद्धी (जलसंधारणाचा उत्तम नमुना म्हणून प्रसिद्ध ) व हिवरेबाजार (ग्रामीण विकास- आदर्श गाव) येथे जाण्याचे दि. १६ व १७ जानेवारी २०१९ रोजी नियोजित असून आपल्या परवानगीची आवश्यकता आहे, तरी महोदय साहेबांनी आमच्या विनंतीचा सकारात्मक विचार करून शैक्षणिक सहलीसाठी परवानगी द्यावी ही नम्र विनंती.

**प्रा. शिवानंद तानाजीराव जाधव**
भूगोल विभाग प्रमुख व
समन्वयक, शैक्षणिक सहल समिती
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा

Head & Asst. Prof. Dep.. of Geography
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,
Kharda, Tal.Jamkhed Dist. A.Nagar

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

दि. ०७/०१/२०१९

# भूगोल विभाग

## सूचना

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, बुधवार दि.१६ व गुरुवार १७ जानेवारी २०१९ रोजी भूगोल विभागाच्या वतीने क्षेत्रभेटीसाठी निघोज (रांजणखळगे), राळेगणसिद्धी (जलसंधारण कार्य) व हिवरेबाजार (आदर्श गाव) पाहण्यासाठी व तेथील वैशिष्ट्ये अभ्यासण्यासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी सोमवार दि.१४/०१/२०१९ पर्यंत प्रा. शिवानंद जाधव यांच्याकडे नावनोंदणी करावी.

विभाग प्रमुख

Head & Asst. Prof. Dep.. of Geography
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,
Kharda, Tal. Jamkhed, Dist. A.Nagar

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

प्राचार्य
श्री संत गजानन महाविद्यालय
खर्डा, ता. जामखेड, जि. अ. नगर

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे

# श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा.

ता. जामखेड. जि.अहमदनगर

( ID NO. PU / AN /A/ 72 / 2002 )

डॉ.एम.एन.गुळवे
प्राचार्य

फोन : ( ०२४२१ ) २४०१०५, फॅक्स :- २४०१०५, वेब :ssgmkharda.in ई-मेल : ssgmkharda@gmail.com

जा.क्र.:एसएसजीएमके/२०१८-१९/ दि. १५/०१/२०१९

प्रति,

मा. अण्णा हजारे,
ज्येष्ठ समाजसेवक
राळेगण सिध्दी.

**विषय : भूगोल विभागाच्या शैक्षणिक सहलीस मार्गदर्शन व सहकार्य करणे बाबत...**

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. वर्गाच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून भूगोल विभागाच्या वतीने बुधवार दि. १६ व १७ जानेवारी, २०१९ रोजी दोन दिवसीय शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन केले आहे. तरी आपल्या ग्रामपंचायतीने देशपातळीवर उत्कृष्ट जलव्यवस्थापन व जलसंवर्धन संकल्पना राबवली आहे. याचा आमच्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी व आपल्या ग्रामपंचायतीस भेट देणार आहोत. तरी आमच्या विद्यार्थ्यांना आपण मार्गदर्शन व सहकार्य करावे.

कळावे,

प्राचार्य
श्री संत गजानन महाविद्यालय
खर्डा,ता.जामखेड जि.अ.नगर

१६/०१/२०१९
भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास
राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर ४१४ ३०२

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे
# श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा
ता. जामखेड. जि.अहमदनगर
( ID NO. PU / AN /A/ 72 / 2002 )
डॉ.एम.एन.गुळवे
प्राचार्य
फोन : ( ०२४२१ ) २४०१०५, फॅक्स :- २४०१०५, वेब :ssgmkharda.in ई-मेल : ssgmkharda@gmail.com

जा.क्र.:एसएसजीएमके/२०१८-१९/ दि. १५/०१/२०१९

प्रति,
मा. ग्रामसेवक,
मौजे - हिवरेबाजार
ता. नगर.

**विषय : भूगोल विभागाच्या शैक्षणिक सहलीस मार्गदर्शन व सहकार्य करणे बाबत...**

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. वर्गाच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून भूगोल विभागाच्या वतीने बुधवार दि. १६ व १७ जानेवारी, २०१९ रोजी दोन दिवसीय शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन केले आहे. तरी आपल्या ग्रामपंचायतीने देशपातळीवर उत्कृष्ट जलव्यवस्थापन व जलसंवर्धन संकल्पना राबवली आहे. याचा आमच्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी व आपल्या ग्रामपंचायतीस भेट देणार आहोत. तरी आमच्या विद्यार्थ्यांना आपण मार्गदर्शन व सहकार्य करावे.

कळावे,

ग्रामपंचायत कार्यालय, हिवरेबाजार, स्थापना ता. २३/३/१९६० ता. नगर, जि. अहमदनगर
16/01/2019

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

प्राचार्य
श्री संत गजानन महाविद्यालय
खर्डा, ता.जामखेड जि.अ.नगर

# शपथ पत्र

मी ....मिसाळ.....आकाश.....बाळु........................ विद्यार्थी श्री संत गजानन महाविद्यालयात ..S.Y.B.A.. बी.ए. या वर्गात शिकत असून माझा भूगोल हा ऐच्छिक विषय आहे. भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक सहलीचे दरवर्षी आयोजन केले जात असून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आयोजित केलेल्या शैक्षणिक / भौगोलिक सहलीमध्ये खाजगी वाहनाने प्रवास करावयाचा आहे याची आम्हाला महाविद्यालयाने पूर्व कल्पना दिलेली आहे. सदर सहलीत मी स्वतः तसेच कुटुंबाच्या संमतीने सहभागी झालो आहे.

प्रस्तुत शैक्षणिक सहलीत माझ्याकडून कसल्याही प्रकारचे गैरवर्तण होणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच या सहलीमध्ये कांही दुर्देवी व अघटीत घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी व माझ्या कुटूंबाची असेल. या अघटीत घटनेला भूगोल विभाग अथवा महाविद्यालयाचे प्रशासन जबाबदार राहणार नाही असे आम्ही कबुल करतो.

सहलीचे ठिकान :- भिम्मा-कोरेगाव, निघोज, राळेगणसिध्दी, वडगाव(दर्या), हिवरे-बाजार.

दिनांक :- १६ व १७ जानेवारी, २०१९

Nisal A.B.

बाळु मिसाळ
पालकांचे नाव व सही
मो. नं. 7888291414 .

मिसाळ आकाश
विद्यार्थ्यांचे नाव व सही :-
वर्ग :- S.Y.B.A.

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

भूगोल विभाग

DATE........./........./........

दि. 16 व 17 जानेवारी 2019 रोजी आयोजीत करण्यात आलेल्या शैक्षणिक सहलीमध्ये राळेगणसिध्दी, निघोज (कुकडी नदीवरील रांजणखळगे व आदर्शगाव हिवरेबाजार येथे जाण्यासाठी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी:

दि. 16/1/2019

उपस्थित विद्यार्थी

1. भोगिल ऋषीकेश सुरेश
2. काळे कृष्णा समाधान
3. महाकाले अनिल भालचंद्र
4. बागजे निकिता नेताजी
5. आहेर प्रियंका देविदास
6. गायभाय अश्विनी हिरामण
7. वराट अश्विनी अनिल
8. चव्हाण दिपाली सुनिल
9. चौघुले राधिका अनिल
10. चव्हाण ज्योती शहाजी
11. होडशिळ पार्वती सिताराम
12. हुलगुंडे रुपाली गौतम
13. सपकाळ महेंद्र रविंद्र
14. साठे सनिकेत शाम
15. मिसाळ आकाश बाळु
16. अत्तार अल्ताफ मुख्तार
17. बिरंगळ रविना कैलास
18. शेख रियाज सलीम
19. गोलेकर सुरज नंदकुमार
20. वझुंनकर लहु रामदास
21. पोळ अभिमन्यु अर्जुन
22. गोलेकर सुरज नंदकुमार
23. सय्यद आलकाब इकबाल

प्राध्यापक वर्ग

1. प्रा. शिवानंद तानाजीराव जाधव
2. प्रा. नकुल पोपट खवळे

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

श्री .छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे

# श्री.गजानन महविद्यालय, खर्डा

## ता:जामखेड ,जि:अहमदनगर (महा.)

## भूगोल विभाग

# भोगोलिक अभ्यास सहल वृत्तांत

## मार्गदर्शन:प्रा.शिवानंद जाधव

## शैक्षणिक वर्ष:-२०१८-१९

-:प्रस्तुतकर्ते:-

## नाव: आत्तार आल्ताफ मुख्तार

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे

# श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा .

ता.जामखेड ,जि.अहमदनगर

## भूगोल विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल विषयाच्या अभ्यासाचा अनिवार्य भाग म्हणून भोगोलिक सहल / ग्राम सर्वेक्षण परिक्षकांच्या अभिप्रायास्तव सादर करण्यात येत आहे

## प्रमाणपत्र

प्रमाणिक करण्यात येते की ....आत्तार आल्ताफ मुख्तार....
बैठक क्रमांक ..५२११४.... बी.ए.द्वितीय वर्षे / ~~तृतीय वर्ष~~ भूगोल यांनी शैक्षणिक वर्ष:-२०१८-१९ या वर्षातील भोगोलिक अभ्यास सहल / ग्राम सर्वेक्षण अत्यंत सुबक व उत्कृष्ट पद्धतीने तयार केला आहे.

सदर अहवाल यापूर्वी कोठेही प्रसिद्धीस दिलेला नसून ते त्यांचे स्वत: चे संशोधन कार्य आहे.

09 / 10

बह्यपरीक्षक

भूगोल विभाग प्रमुख

Head & Asst. Prof. Dep.. of Geography
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,
Kharda, Tal. Jamkhed, Dist. A.Nagar

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

# प्रस्तावना

भूगोल विषयात अभ्यासाला अत्यंत महत्त्व आहे .विषय अचूक समजण्यासाठी सभोवतालच्या घटक निरक्षण करणे फारच आवश्यक आहे . भोगोलिक/नेसर्गिक घटकांचा मानवी जीवनावर ,विकासावर परिणाम पडलेला दिसून येतो .हा परिणाम आपण प्रत्यक्ष स्थळांना भेटी देऊन अभ्यासला .

तेथील मानवी जीवन व भौतिक पाद्यावान यातील सहःसंबंध लक्षात येतो.हे सहःसंबंध समजण्यासाठी भूगोल अभ्यासत क्षेत्र अभ्यासला अत्यंत सधारण क्षेत्र आहे .

अहमदनगर जिल्हा भोगोलिक दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे .या जिल्ह्यात अनेक भू विशीष्टे निर्माण जालेले असून जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात कुकडी नदी ने आपल्या नदी पात्र्यात निघोज या ठिकाणी असंख्य रांजणखळगे निर्माण झालेले आहे .

या बरोबरच जिल्ह्यतील राळेगणसिद्धी व हिवरेबाजारात हि भोगोलिक हम्प्या पर्जन्य झायेच्या प्रदेशतील गावे विविध प्रकारच्या पूरक योजनेने अमलबजावणी करून जगाच्या नकाशावर झळकली आहे

वरील भोगोलिक स्थळांची विशीष्टे जाणून घेण्याच्या -दृष्टीकोनातून दि.१६ व १७ जानेवारी रोजी भूगोल विभागाच्या वतीने बी.ए.द्रुतीय वर्षाच्या विद्याथ्यांची

शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली आहे .

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

महाविद्यालयात भूगोल विभागातील बी.ए. द्वतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची एकत्रित येऊन सहलीची कार्यक्रम व क्षेत्रनिश्चिती करण्यात आली .त्याद्वारे खालीलप्रमाणे सहलीचे नियोजन व व्यवस्थापन करण्यात आले

दि.१६ जानेवारी २०१९ सकाळी ठीक ६:०० वाजता
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा .

↓

राळेगणसिद्धी - ↓ १०:००वाजता

↓

निघोज - २:००वाजता

↓

हिवरेबाजार - ४:०० वाजता

↓

श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा - ९:०० वाजता

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

# राळेगण सिद्धी - आदर्श भारतीय खेडे

राळेगण सिद्धी हे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तलुक्यातील गाव आहे. ग्रामस्थांच्या सहकार चळवळीद्वारे राळेगण सिद्धी या गावाचा कायापालट घडला आहे. स्वच्छता, पाणी व्यस्थापन व सामाजिक सलोखा यावर महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठसमाजसेवक, अण्णा हजारे यांनी भर दिला होता व हा बदल घडवून आणला. या कामाबद्दल गावाला अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

आजही देशभरातून या गावाची भरभराट कशी झाली हे जाणून घेण्यासाठी लोकांची रीघ लागलेली असते.आज लोकांनी स्वत: पुढाकार घेवून आपल्या गावामध्ये असे प्रयोग करून गावाचा विकास करण्यास स्वताचा हातभार लावू शकतात.

महाराष्ट्रातील अहमदनगर तालुक्यातले राळेगण सिद्धी हे एक खेडे. दुष्काळ, कर्जबाजारीपणा, बेकारी अशा गोष्टी तिथे होत्याच. ह्याच खेड्यातील एक रहिवाशाचे नाव होते अण्णा हजारे. १९७५ साली लष्करी सेवेमधून निवृत्त होऊन अण्णा राळेगण सिद्धीला परतले तेव्हा त्यांनी सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन राळेगण सिद्धीचे रूप पालटण्याचा निश्चय केला.

आज इतर प्रत्येक खेड्याच्या तुलनेमध्ये राळेगण सिद्धी हे 'आदर्श खेडे' मानले जाते. इथे आज मोठ्या प्रमाणात झाडे लावली गेली आहेत व टेकड्यांवर विशिष्ट प्रकारे बांधबंदिस्ती करून वाहून जाणाऱ्या पाण्यामुळे होणारी जमिनीची धूप थांबवली गेली आहे. पावसाचे हे पाणी साठवून वापरण्यासाठी इथे मोठे बांधीव कालवे तयार केले आहेत. ह्यामुळे ह्या भागातील भूजल-पातळी लक्षणीयरीत्या उंचावली असून कोरडी पडलेली विहीर अथवा कूपनलिका (बोअरवेल) दिसत नाही. पूर्वी दरवर्षी जेमतेम एक पीक हाती येत असे तर आता इथे वर्षाला तीन पिके घेतली जातात.

अपारंपारिक ऊर्जेच्या क्षेत्रामध्ये राळेगण सिद्धीने मोठी मजल मारली आहे ह्यात शंकाच नाही. रस्त्यांवरचे दिवे सौरऊर्जेवर चालवले जातात - प्रत्येक दिव्याला स्वतंत्र पॅनल आहे. सर्व स्वच्छतागृहे व शौचालये येथील ४ मोठ्या बायोगॅस सयंत्राना जोडलेली आहेत. पाणी उपसण्यासाठी एक मोठी पवनचक्की आहे. एवढेच नाही तर घराघरांतदेखील स्वतंत्र बायोगॅस सयंत्रे आढळतात. हे एक स्वयंपूर्ण खेडे आहे.

गेली बत्तीस वर्षे ज्या गावाने संपूर्ण व्यसन मुक्ती, शेतीत पाणी अडवा पाणी जिरवा, चराईबंदी, झाडावर कुऱ्हाडबंदी असे उपक्रम राबविले आहेत त्यातून शंभरपेक्षा अधिक गांवांचे असे प्रशिक्षण केले आहे आणि ज्यांचा दिवसच हरिपाठाचे अभंग, ज्ञानेश्वरी आणि तुकारामाची गाथा यांच्या वाचनानी सुरु होतो ते अण्णा हजारे यांचे राळेगण सिद्धी हे नगरजिल्ह्यातील गाव सध्या आंदोलनामुळे एका बाजूला देशातील सर्वांचे आकर्षण केंद्र बनले आहे तर दुसऱ्या बाजूला नगर जिल्हा, पुणे जिल्हा आणि सोलापूर जिल्हा येथील नागरिकांचे तीर्थक्षेत्र बनले आहे. ज्याला जमेल त्याला एक वेळ, एक दिवस दोन दिवस असा

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

उपास करणे आणि राळेगण सिद्धीला पायी वारी समजून जाऊन येणे अवघ्या सव्वादोन हजार लोकसंख्या असणाऱ्या राळेगणमध्ये सध्या तरी बाहेरहून आलेले दररोज सव्वादोन हजार अन्य ग्रामस्थ राळेगण बघण्यास आलेले असतात. सध्या सारे राळगण तिहार जेलचा भाग झाले आहे कारण 'आपले अण्णा' तेथे उपोषणाला बसले आहेत. शुक्रवारी सकाळी अण्णा आणि सारे सहकारी रामलीलामैदानापर्यंत पायी जाणार आहेत.म्हणे सारी दिल्ली लोटणार आहे. तर सारे राळेगण गावाची पायी वारी करणार आहे.

बत्तीस वर्षापूर्वी जेंव्हा सेनेतील सेवा संपवून अण्णा येथे आले तेंव्हा गावाची लोकसंख्या दोन हजार होती. गावात एकच जोरात चालणारा व्यवसाय होता तो म्हणजे ४२ हातभट्ट्या. राळेगणला जवळचे शहर म्हणजे पुणे जिल्ह्यातील शिरूर. शिरूरला ऐतिहासिक महत्व बरेच आहे पण गेली पन्नास वर्षे शिरुर ही महाराष्ट्राची जर्दा आंण गुटका यांची राजधानी. येथून राज्याबाहेरही माल जातो. त्या व्यापाऱ्यांना जाताना राळेगणची पहिल्या धारेची हातभट्टी स्वतात मिळायची.

परगावी तयार माल पाठवण्यासाठी मोटारीच्या चाकाच्या ट्यूबमध्ये भरलेली पार्सल्स तयार शिरूर पोहोच होत, त्यामुळे बेचाळीस लोकांच्या खिशात पैसा खुळखुळायचा पण बाकींच्या प्रथम फुकट, नंतर उधार आणि नंतर भक्कम किमतीने प्रत्येक गावी दारू आणि गुटका हेच पुरुषार्थाचे लक्षण मानले जायचे. गावाची सव्वादोन हजार एकर जमीन तशी कोरडवाहू पण अनेकानीआपल जमीन शिरुरच्या आणि पारनेरच्या सावकाराकडे गहाण ठेवलली असायची.

आज अण्णांनी दिल्लीला उपोषण सुरु केले आहे. देशातील कोटी कोटी जनता 'मी अण्णा हजारे ' असे अभिमानाने मिरवत आहे. गांधी टोपीला पुन्हा प्रतिष्ठेचे दिवस आले आहेत. पस्तीस वर्षापूर्वी अण्णा लष्करी सेवेतून निवृत्त होउन आले तेंव्हा ही गावची स्थिती बघून आपण काही करू शकतो असे वाटले व त्यासाठी घरी मुक्काम न नेता गावच्या पडक्या मंदिरात मुक्काम नेला.तो आजही तेथेच आहे. ते मंदीर आता राष्ट्रीय कुटीर झाले आहे.

१९६५च्या पाकिस्तानविरोधातील युद्धात त्यांच्या वाहनावर बॉम्बशेल पडला आणि ते सोडून सारे मरण पावले. त्याचा त्यांना येवढा त्रास झाला की, त्यांची पावले आत्महत्येच्या दिशेने निघाली. सहज जाता जाता रस्त्याच्या कडेला जुनी पुस्तके विकणाऱ्याकडे एक दुमडून पडलेलेस्वामी विवेकानंद यांचे एक पुस्तक दिसले. उत्कंठेपोटी त्यानी उचलले. त्यात गीतेचा संदेश होता. मिळालेले जीवन हे लोकोपयोगासाठी आहे. तुझा धीर कसा खचतो. तुझ्यात असामान्य सामार्थ्य आहे. असा वाक्य वाचायला मिळाले. राणेगणला जाण्यापूर्वी ते प्रथम आळंदीला गेले. तेथे एकच गोष्ट मिळाली ती म्हणजे स्वामीजींचे ते वाक्य खरे आहे असे वाटू लागले.

आज देशात भ्रष्टाचार हटविण्याच्या मंत्राचे नाव 'अण्णा हजारे' झाले आहे. पन्नास वर्षापूर्वी ग.दि.माडगूळकर यांनी चीनयुद्धाच्या वेळी 'लढतील सैनिक लढू नागरीक , लढतील महिला लढतील बालक. अशा आशयाचे गीत लिहिले होते. त्याची प्रचीती

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar




गेले दोन दिवस अण्णांच्या उपोषणाचा मुक्काम तिहार जेलमध्ये आहे. उपोषणाच्या आधारे भ्रष्टाचाराविरोधातील जिकता येते याची खात्री देशातील सामान्य माणसाला वाटू लागली आहे. पण साऱ्या जगाला याचे आश्चर्य वाटत आहे. आजची जगातील न्यूयॉर्क टाईम्स, वॉशिंग्टन पोस्ट, ब्रिटनमधील मँन्चेस्टर गार्डियन, रशियातील प्रवदा, चीनमधील पीपल्स डेली, फार्मोसामधील चायना पोस्ट, मलेशियातील द स्टार, पाकिस्तानमधील डॉन या दैनिकांनी पहिल्या पानावर कोणी अण्णांचे चित्र तर कोणी तिहार जेलचे चित्र कोणी राणेगणसिद्धीचे चित्र तर कोणी आळंदीत केलेल्या पंधरावर्षापूर्वीच्या पहिल्या भ्रष्टाचार निर्मूलन उपोषणाचे चित्र दिले आहे.

पण पंचवीस वर्षापूर्वीच अण्णांचे राळेगण हे स्वयंपूर्ण ग्राम तर झालेच पण तेथील माणूसही येवढा बदलला की, ते आदर्शग्राम आदर्श सेवाग्राम झाले.

अण्णा हा असा समाजसेवक आहे की, तेथे फक्त एकमार्गी लोकसेवा नाही तर आंदोलनासाठी कठोरात कठोर होण्याची क्षमता त्यांच्यात आहे. ज्याना महात्मा गांधी यांची भाषा कळणार नाही त्यांना शिवाजी महाराज यांची भाषा कशी समजावून सांगायची याची खुबी त्यांच्याजवळ आहे. राळेगणमधील ४२ हातभट्ट्या त्यांनी कसा उध्वस्त केल्या आणि पंचक्रोशीतील व्यसनी लोकांना परत मार्गावर कसे आणले हे स्थानिक लोकांना माहीत आहे. १९९० अण्णा हे फक्त याच भागातील रचनात्मक

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

# निघोज

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील सुखी, समृद्ध असणारे गाव निघोज . अहमदनगर जिल्हयाच्या शेवटच्या टोकावर कुकडी नदी ( पुष्पा ) च्या काठावर आहे . तसेच शिरूर ( जि.पुणे ) येथून २४ कि.मी. अंतरावर आहे. निघोज हे गाव सामाजिक , शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात अग्रेसर आहे. गावाचे ग्रामदैवत असलेले जागृत देवस्थान श्री मळगंगा देवीचे मोठे मंदिर आहे.

मळगंगा मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम लोक वर्गणीद्वारे पूर्ण झाले आहे. गाभाऱ्याचे बांधकाम १५ फूट रूंद आहे. सभामंडप ३२ फूट रूंद आहे. मंदिराच्या कळसची ऊंची जमिनीपासून ८५ फूट आहे. संपूर्ण मंदिराचे बांधकाम संगमरवरी दगडामध्ये केलेले आहे.

निघोज गावातील देवीच्या मंदिराच्या पाठीमागे १०० फूट अंतरावर बारव ( विहीर ) आहे. याच बारवेमधून मळगंगा देवी घागर रूपाने दर्शन देते. या बारवेचे बांधकाम पेशवाई काळात झाले आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्याच्या शेवटी टाकळीहाजी नावाचे गाव आणि नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याचे निघोज गाव. या दोघांच्या सीमेवरून कुकडी नावाची नदी वाहत गेलेली आहे. या कुकडी नदीच्या दोनही काठांवर बेसॉल्ट खडक आहे. या खडकातच निसर्गाचा अद्भुत आविष्कार आपली वाट पाहत उभा आहे. पृथ्वीतलावर सर्वात श्रेष्ठ शिल्पकार कोण असेल तर तो आहे निसर्ग. कारण या निसर्गाने आपल्या भोवताली इतक्या सुंदर कलाकृती निर्माण केल्या आहेत की, पाहणाऱ्याचे डोळेच दीपून जावेत. निसर्गाकडून तयार झालेल्या साऱ्याच कलाकृती या अवाढव्य आणि डोळे विस्फारणाऱ्या आहेत.

आपण सह्याद्रीच्या डोंगररांगांकडे गेलो की, या जास्त ठळकपणे समोर येतात. मग आपलीही बोटे आश्चर्याने तोंडात जातात. मानवाच्या शक्यतेपलीकडच्या या कलाकृती निसर्गाने तयार केलेल्या आहेत. त्या विशेष आयुधांनी. एखाद्या मानवी शिल्पकाराकडे जसे छन्नी, हातोडा अशी साधनसामुग्री असते, तसेच निसर्गाकडे पाणी, हवा, अग्नी अशी पंचमहाभूतांनी भरलेली वेगळी पण वैशिष्ट्यपूर्ण आयुधे आहेत. या आगळ्यावेगळ्या शस्त्रांनी निसर्गाने साऱ्या जगाला हेवा वाटावा अशा कलाकृती निर्माण केल्या आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर अहमदनगरमधील धडकी भरवणारी सुप्रसिद्ध सांधण व्हॅली, पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात असणारी 'तैल-बैल' या जोड डोंगराच्या भिंती, याशिवाय डोंगर-पर्वतांमध्ये तयार झालेल्या सुंदर घळी, कपारी, बुलडाण्यातील लोणार सरोवरसारख्या कैक कलाकृती निसर्गाचे अद्भूत लेणे म्हणून जगप्रसिद्ध आहेत.

पुणे आणि नगर जिल्ह्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या कुकडी नदीतील निसर्गनिर्मित रांजणखळगे (पॉट होल्स) इतक्या संख्येने आपल्याला इतर कुठेही

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar




नैसर्गिकरित्या तयार झालेले हे खड्डे म्हणजे निसर्गाचा अक्षरश: विस्मयकारी चमत्कारच आहे. ह्या खड्डयांचा आकार रांजणा सारखाच असून ह्या कुंडातील पाणी दुष्काळातसुध्दा आटत नाही. महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये या विभागाची निर्मिती केली. महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलांचे जतन करणे, गड किल्ल्याचे संवर्धन, करणे तसेच राजयातील पर्यटन व्यवसाय वाढविणेअसे विविध उपक्रम या विभागामर्फत राबविले जातात.




[निघोज]

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

# समृद्ध एक हिरवगार गाव (हिवरेबाजार)

अहमदनगरपासून 16 कि. मी. अंतरावरचं हिवरे बाजार. अंदाजे 1200 लोकवस्तीचं हे एक केवळ खेडं नाही. ते आहे वैभवशाली इतिहासाची जपणूक करणारं, आधुनिकतेची कास पकडून समृद्धीचा मंत्र सांगणारं एक छोटंस हिरवंगार गाव.

खेडं हा भारताचा आत्मा आहे. खेड्यांच्या शाश्वत विकासातून समृद्ध भारताची पायाभरणी कशी होते याचे उत्तम उदाहरण हिवरे बाजारने निर्माण केले असून एक आदर्श गाव म्हणून राज्याला आणि देशाला आपली स्वतंत्र ओळख करून दिली आहे. या आदर्शत्वाचा जवळून अनुभव घेण्यासाठी या गावाला भेट दिली आणि अनेक गोष्टी मनाला स्पर्श करून गेल्या.

हिवरे बाजारला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासूनचा इतिहास आहे. गावात पूर्वी हत्ती, घोड्यांचा बाजार भरवला जायचा. या बाजारामुळेच गावाच्या नावामागे बाजार हा शब्द चिकटला तो कायमचाच. पूर्वीपासून समृद्ध असलेल्या या गावात वाढत्या शहरीकरणाचा प्रभाव पडला. सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, अनियमित पाऊस, शेतमालाला मिळणारा कमी भाव, गावात रोजगार संधींचा अभाव, अस्वच्छता, स्थलांतर यासारख्या समस्यांनी इतर गावांप्रमाणे या गावालाही ग्रासलं. पण गावानं हा अनुभव घेतला तो 1989 पर्यंत. बाहेर शिकायला गेलेली मंडळी शिकली, मोठी झाली आणि शहरातच स्थिरावली. पण एक ध्येयवेडा तरूण शिकल्यानंतर गावातच काम करायचं या निर्धाराने गावी परत आला. त्याचं नाव पोपटराव पवार.

बदल करायचा तर सत्ता हातात हवी, म्हणून गावाच्या राजकारणात उतरून ते गावचे सरपंच झाले. गावात माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी केलेला प्रयत्न असो किंवा लोकसहभागातून गावातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केलेला प्रयत्न. पोपटराव पवारांचा गाव विकासाचा निर्धार अधिकाधिक पक्का होत गेला.

पूर्वी फक्त कागदोपत्री ग्रामसभा व्हायची. मग आपल्या कामात लोकसहभाग मिळवायचा कसा? त्यांनी युक्ती लढवली. ग्रामसभेची तयारी बरेच दिवस आधी करून प्रत्येक घरात ग्रामसभेचा निरोप आणि ग्रामसभेत चर्चेला घ्यावयाच्या विषयांची यादी पाठवली. त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला. ग्रामसभेच्या दिवशी नेहमीपेक्षा जास्त लोक सभेला आले, चर्चा झाली, लोकांनी आपली मतं मांडली, निर्णय झाले. त्या दिवशी खऱ्या अर्थाने गाव विकासाचे नियोजन लोकांमधून झाले आणि गावकऱ्यांच्या मनात गाव विकासाप्रती एक बांधिलकीही निर्माण झाली.

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed,Dist.Ahemednagar

पाणी प्रश्न सोडवण्यासाठी पाणलोट क्षेत्राचा विकास करण्याचा विचार ग्रामसभेत मांडण्यात आला. केवळ शासनावर विसंबून न राहता पूर्ण गावानं प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. आसपासचा डोंगर, पडीक तसेच गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड झाली. दरवर्षी मानसी एक झाड लावण्याचा संकल्प करताना गावाने स्मृतिवन विकसित केले. गावातील मृत व्यक्तीच्या नावाने येथे झाड लावलं जातं, त्याचं संगोपन केलं जातं.

पावसाचं पाणी अडवण्यासाठी सरल समतल चर, पाझर तलाव खोदण्यात आले.



शेतकऱ्यांनी आपल्या शक्यतेनुसार शेतात शेततळी घेतली. काही वर्षात श्रमदानातून लावलेली ही झाडं आता जंगल वाटावीत एवढी मोठी आणि हिरवीगार झाली आहेत. पाणी अडवा- पाणी जिरवा ही मोहीम यशस्वीरित्या राबविल्याने पडलेल्या पावसाचं पाणी अडलं-जिरलं. त्याचा परिणाम गावातील जलस्त्रोतांची पाण्याची पातळी वाढण्यात झाला.1990 पूर्वी 90 ते 140 फुटावर लागणारं पाणी आता 35 ते 60 फुटावर आलं. गावात 318 विहिरी. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम यशस्वीरित्या राबविल्याने तळाला गेलेल्या विहिरी नितळ पाण्याने भरून गेल्या. पाझर तलाव, शेततळी भरून वाहू लागली. गाव बेसाल्ट खडकावर वसलेलं. त्यामुळे गावकऱ्यांनी जमिनीच्या आतमध्ये वेगवेगळ्या स्तरावर स्फोट घडवून आणून जमिनीमध्ये पाणी साठवण्यासाठी जागा निर्माण केली. त्याला जोडून माथा ते पायथा या पद्धतीने पाणी अडवलं, पाणी वापराचा ताळेबंद निश्चित केला. त्यातून पाण्याचा संचय वाढला. यामुळे दुष्काळाला दूर ठेवण्यात गाव यशस्वी झालं. पाणी आलं तसं समृद्धी आली, गावाची अर्थव्यवस्था सुधारली.

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed,Dist.Ahemednagar

शाळा झाली, पाणी झालं, संस्कार झाले, शिक्षण-प्रशिक्षण झाले आता गावाने शेती आणि शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष घातलं. उत्पन्न वाढवायचं असेल तर शेतीपूरक व्यवसाय हवा या भावनेतून गावात दुग्धव्यवसायाला चालना देण्यात आली. गावात दुध डेअरीची स्थापना करण्यात आली. चार-पाच चारा डेपो तयार करण्यात आले. त्यामुळे गावातील जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध झाला. घरटी जनावरांची संख्या वाढली.

गावात गुरं आली तसा पशुवैद्यकीय दवाखानाही. त्याचाही चांगला परिणाम दिसून आला. गावातील दुध उत्पादन वाढले. 1990 पूर्वी गावात होणारं 150 लिटरचं दुध उत्पादन आता 4 ते 5 हजार लिटरच्या आसपास गेलं आहे.

लोकांमध्ये आत्मियता वाढली. गावातील जमीन गावाबाहेरील माणसाला विकायची नाही, गावात कोणीही बोअरींग घ्यायचे नाही, गावातील शेती विहिरीतील पाण्यावरच करायची. ऊस, केळ्यासारखी पिकं गावात घ्यायची नाहीत असे ठराव ग्रामसभेत मांडले गेले आणि ते जसे मंजूर झाले तसेच सगळ्यांनी त्याचे पालनही केले.

गावात विवाहापूर्वी मुला-मुलींची एच.आय.व्ही चाचणी करणे बंधनकारक आहे. संपूर्ण गावाची एकाचवेळी शेतजमीन मोजणी करण्याचं अनोखं कामही गावाने केलं आहे. एक गाव एक स्मशानभूमी सारखा उपक्रम राबविताना पोपटराव पवारांना मिळालेल्या दलित मित्र पुरस्काराच्या रकमेतून मागासवर्गीय कुटुंबांना स्नानगृहे बांधण्यासाठी मदत करण्यात आली. गावात गेल्या दहा वर्षापासून एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविली जाते.
गणपती किंवा नवरात्री सारखे उत्सव साजरे करताना प्रतिकात्मक छोट्या मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्यामुळे दरवर्षी नवी मूर्ती विकत घेण्यासाठी लागणाऱ्या पैशांची बचत तर होतेच त्याचबरोबर जलप्रदूषणालाही आळा बसतो.

गावात उत्सवकाळात घरगुती पुजांमधून निर्माण होणारे निर्माल्य एकत्र करून त्याचा खत म्हणून वापर केला जातो.गावात तंटा नाही की दारू. गावात दारु तसेच गुटखाबंदीची 100 टक्के अंमलबजावणी केली जाते. गावातील दुकानात गुटखा, तंबाखु, सिगारेट विक्रीला बंदी आहे. ग्रामसभेने तसा केवळ ठराव केला नाही तर त्याची काटेकोरपणे अंमलबजावणीही केली.

ग्रामविकासाच्या सर्व कामात आणि समित्यांमध्ये महिलांचा सहभाग चांगला असून गाव, गावठाण, रस्ते, वस्त्यांची स्वच्छता यामध्ये सगळा गाव एक होऊन काम करतो. गावातील ओला आणि सुका कचरा वेगवेगळा गोळा केला जातो. त्यापासून गांडूळ तसेच कंपोस्ट खत तयार करण्यात येते. गावात वैयक्तिक 50, सार्वजनिक 4 ठिकाणी कचऱ्यापासून खत

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

निर्मिती होते. गाव पूर्ण हागणदारीमुक्त असून शौचालय गोबरगॅसला जोडून त्याचा वापर ऊर्जा निर्मितीसाठी करण्यात आला आहे.

गावात 8 सौरपथ दिवे आहेत तर ग्रामपंचायत कार्यालयात होम लाईट सिस्टिम बसविण्यात आली आहे. 78 घरांत सौर कंदिलाचा वापर सुरु आहे. गावातील 230 कुटुंबांपैकी 98 कुटुंबांकडे सौरदिवे आहेत. गावातील 73 कुटुंबांकडे गोबरगॅस, 90 कुटुंबांकडे बी.पी. ऊर्जा चूल, 58 कुटुंबांकडे एलपीजी गॅस आणि 8 जणांकडे रॉकेल स्टोव्ह आहे.

आज गावात श्रीमती सुनीताबाई पवार सरपंच आहेत तर पोपटराव पवार उपसरपंच. या द्वयींच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसेवक बी.टी. लोंढे ग्रामविकासाची ही उज्ज्वल परंपरा पुढे नेत आहेत. एक मुल एक झाड, बालवृक्षमित्र पुरस्कार, चराई बंदी, कुऱ्हाडबंदी सारख्या उपक्रमाबरोबरच गावात लग्नात वराती आणि बॅन्जोला मनाई आहे.

गावाला अनेक मान-सन्मान आणि पुरस्कारांनी गौरविले आहे. देश विदेशातून गावाला दररोज 400 ते 500 लोक भेट देतात. यात अर्थतज्ज्ञ आहेत, शेती तज्ज्ञ आणि जलतज्ज्ञ आहेत.

विविध गावांचे सरपंच ते राष्ट्रीयस्तरावर नेतृत्व करणारी नेतेमंडळी देखील आहेत. त्यामुळेच हिवरे बाजार हे केवळ एक गाव नाही, ते आहे परिपूर्ण विकासाचं आदर्श संकल्पचित्र. जे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सांगतेय हिरव्यागार गावांच्या समृद्धीचा मंत्र.

महाराष्ट्र शासनाचा आदर्श गाव पुरस्कार - 1995
महाराष्ट्र शासनाचा यशवंत ग्राम पुरस्कार - 2000
भारत सरकारचा निर्मल ग्राम पुरस्कार - 2007
भारत सरकारचा वनग्राम पुरस्कार- 2007
भारत सरकारचा राष्ट्रीय जल पुरस्कार- 2007
संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पुरस्कार- 2007
महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम पुरस्कार 2008
राजमाता जिजाऊ पुरस्कार 2012

******

Head & Asst. Prof. Dept. of Geography
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,
Kharda, Tal. Jamkhed, Dist. A.Nagar

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar

ALTAF ATTAR
MO:9730851021

# Department of Geography
## STUDY TOUR REPORT- 2018-19

Department of Geography conducted an educational Study tour on dated 16 & 17[th] January, 2019 for first, second- & Third-year students of Geography courses. our study tour visited Ideal Village of Ralegan Siddhi, Pot holes Kukdi River basin in Nighoj, one of the Modal villages of Maharashtra or India Hiware Bazar in the Ahmednagar District. About 22 students and 2 faculty members were the participants. The main purpose of the study tour was to get the students closer to the natural environment, geomorphology & Geographical aspects.

We Study tour started at 8.00 am from College campus. We firstly reached to Ralegan Siddhi at 10.00 a.m. Ralegan Siddhi about 100 km from Kharda and is the Model Village Maharashtra as vell as India. There is one Social worker given as the guidance and information about the Yadav baba Temple, School, watershed management training centre and village. He told as this village awarded from back 19 years as "Adarsh Village". He also introduced their facilities of village like, cleanness of village, well developed school, health club, modern facilities of agriculture, water management, forestation, animal husbandry, economic resources etc.

Out next visit to Nighoj at 4:00 pm. We observed that Malganga temple and fluvial landforms is the holy place in Nighoj. He is a famous place for pot holes of Kukadi River basin in Asia. Then next day our team visit to Hiware Bazar at 10:00 am. village is considered of the biggest success stories of the participatory watershed movement in India. There is one Grampanchayat member given as the guidance and information about the village. The village showed a dramatic change in water availability from being a water scarce region to water surplus through efficient water management. Hiware Bazar today has assured drinking water. They have also managed to plant a rabbi crop, albeit over reduced acreage. A fundamental premise of the program has been to treat water as a community resource. The team reach at 04.00 pm on 17 Jan. at the Kharda college campus.

Head & Asst. Prof. Dept. of Geography
Shri Sant Gajanan Mahavidyalaya,
Kharda, Tal. Jamkhed, Dist. A.Nagar

IC Principal
Shri Chhatrapati Shikshan and
Arogya Prasarak Mandal's
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda
Tal.Jamkhed.Dist.Ahemednagar